# नोकरी देणारी मानसिकता विकसित करावी : कोविंद

## राष्ट्रपतींच्या हस्ते आयआयएम कॅम्पसचे उद्‌घाटन

**प्रतिनिधी** |नागपूर

आयआयएमसारख्या संस्थांमधून शिकून बाहेर पडले की सर्वोत्तम नोकरी आणि पगार मिळतो. पण नागपूर आयआयएमने नोकरी मागणारी नव्हे, तर नोकरी देणारी मानसिकता विकसित करावी, अशी अपेक्षा राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी येथे व्यक्त केली. शहरातील मिहान परिसरात १३२ एकर क्षेत्रावर विकसित करण्यात आलेल्या भारतीय व्यवस्थापन संस्थेच्या (आयआयएम) कॅम्पसचे उद्‌घाटन राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते झाले त्या वेळी ते बोलत होते.

केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान, उद्योगमंत्री सुभाष देसाई, पालकमंत्री डॉ. नितीन राऊत, विधानसभेतील विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस, खा. डॉ. विकास महात्मे, कृपाल तुमाने यांच्यासह नागपूर आयआयएमच्या संचालन मंडळाचे अध्यक्ष सी. पी. गुरनानी आणि संस्थेचे संचालक डॉ. भीमराय मैत्री या वेळी उपस्थित होते.



राष्ट्रपतींनी गोल्फ मैदानाची पाहणी केली.

विविध नवीन क्षेत्रे व्यावसायिकतेच्या परिघात येत चालली असून त्यातून अनेक नव्या वाटा खुल्या झाल्या आहेत. शिक्षण, आरोग्य अशा काही महत्त्वाच्या क्षेत्रात हे नवीन उपक्रम सुरू झाले आहेत. त्यातून रोजगार निर्मितीसोबतच महसूल प्राप्ती होणार असल्याने हा बदल देशासाठी निश्चितच 'गेम चेंजर' ठरू शकतो. नावीन्यता आणि उद्योजकता या दोन्हींमध्ये आपले जीवन सुखकर करण्याची क्षमता तर आहेच, पण त्यासोबतच अनेकांना रोजगार उपलब्ध करून देण्याचीही क्षमता आहे. नोकरी देणारे उद्योजक तयार करावेत असे आवाहन राष्ट्रपतींनी केले.